नौरोसजी वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटल, परळ, मुंबई यांना सन २०१६-१७ च्या खर्चावर आधारित सन २०१७-१८ साठी अनुदान मंजूर करण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अनुदान-२०१८/ प्र.क्र.१२४/राकावि-२,

गो.ते.रूग्णालय आवार, संकूल इमारत, १० वा मजला,
बी-विंग, मंत्रालय, मुंबई - ४००००१
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१९.

वाचा -

१) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक - २५ जानेवारी, २०१९.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन परिपत्रक क्र.अनुदान-२००९/प्र.क्र.४२ /आरोग्य-५, दिनांक :-१३ जानेवारी, २०१०.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक अनुदान-२०१८/प्र.क्र.१२४/राकावि-२, दिनांक २८ मार्च, २०१८ व शासन शुध्दीपत्रक दिनांक ३१ मार्च, २०१८.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक अनुदान-२०१८/प्र.क्र.१२४/राकावि-२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८.
५) सहायक संचालक, (लेखा व लेखा परीक्षा), पुणे यांचे पत्र जा.क्र.ससंआसे/कक्ष-६४/ सहा.अनु/प्रस्ताव/२०१६-१७/१३४००-४०१/२०१८, दि.१५.०९.२०१८.

प्रस्तावना -

या विभागाच्या शासन निर्णय दि.१३.०१.२०१० अन्वये नौरोसजी वाडीया मॅटर्निटी, परळ, मुंबई येथील रुग्णालयास शासनाकडून अनुदान मंजूर करण्याबाबत सुधारित धोरण निश्चित करण्यात आलेले असून त्यानुसार हॅास्पिटलच्या एकूण खर्चातील केवळ वेतन भत्ते व औषधावरील खर्चासाठी संस्थेला अनुदान अनुज्ञेय असून हे अनुदान एकूण खर्चाच्या ८५% मर्यादेत (पैकी ५०% राज्यशासनाचा हिस्सा व उर्वरित ५०% बृहन्मुंबई महानगरपालिकेचा हिस्सा) मंजूर केले जाते. सदर शासन निर्णयानुसार परिगणना केल्याप्रमाणे नौरोसजी वाडीया मॅटर्निटी हॉस्पिटल, परळ, मुंबई या संस्थेस यांना सन २०१६-१७ च्या खर्चावर आधारित सन २०त१७-१८ साठी रुपये १५,२०,०१,७९१/- इतके सहाय्यक अनुदान मंजूर करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानुसार, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २८ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार पहिला हप्ता रुपये

३,३७,२२,९४०/- व दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ च्या संदर्भ ३ च्या शासन निर्णयानुसार दुसरा हप्ता रुपये ४,२०,००,०००/- इतके सहाय्यक अनुदान मंजुर करण्यात आले आहे. उर्वरीत शिल्लक सहाय्यक अनुदान रुपये ७,३२,७८,८५१/- मंजुर करण्यासाठीचा प्रस्ताव सहाय्यक संचालक, (लेखा व लेखा परिक्षा) पुणे यांच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्यामुळे तिसरा हप्ता वित्त विभाग परिपत्रक संदर्भ क्र. १ मधील तरतूदीन्वये उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदी मधून मंजुर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

नौरोसजी वाडीया मॅटर्निटी हॉस्पिटल, परळ, मुंबई या रुग्णालयाला सन २०१६-१७ च्या खर्चावर सन २०१७-१८ साठी रुपये १,२०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी वीस लाख फक्त) इतके अनुदान तिसरा हप्ता म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

सदर खर्च मागणी क्र. आर-१, २२१० -वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,०१-नागरी आरोग्य सेवा- विषम चिकित्सा, ११०- (०३) मुफसल रूग्णालये व दवाखाने यांना सहाय्यक अनुदाने, (०३)(०१)- अध्यापनेतर रूग्णालये व दवाखाने, यांना सहाय्यक अनुदाने, ३१ सहाय्यक अनुदाने, (२२१० ०१७३) या तपशिलवार लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ साठी बी.डी.एस. वर उपलब्ध करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

नौरोसजी वाडीया मॅटर्निटी हॉस्पिटल, परळ, मुंबई या संस्थेस अनुदान वितरीत करण्यास उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी तपासले पाहिजे की वाडिया संस्थेला ज्या अटी व शर्ती लागू आहेत (उदा.गरीब रुग्णांना मोफत किंवा कमी दराने सेवा पुरविणे) त्यांचे पालन होत आहे का.

ज्या-ज्या वेळी निरिक्षणासाठी महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांना संस्थेचे हिशेब पाहिजे असतील त्या-त्या वेळी ते प्रस्तुत कागदपत्रांसहित संस्थेने सादर करावेत.

शासकीय अनुदान म्हणून मिळणाऱ्या रकमेचे हिशेब संस्थेने त्यांच्या नेहमीच्या इतर कार्यक्रमातून वेगळे ठेवणे आवश्यक आहे.

मंजूर नसलेल्या बाबींवरील खर्चाचा समावेश अनुदानात करण्यात आल्याचे आढळून आल्यास त्या खर्चाची एक रकमी वसुली करण्याचा अधिकार शासनास राहील. त्याकरिता वेळेचे बंधन असणार नाही.

हा शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दि.१७ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार वित्तीय अधिकार नियमामध्ये करण्यात आलेल्या सुधारणाप्रमाणे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ चा भाग पहिला, उपविभाग-एक अनुक्रमांक २७ मधील नियम क्र.१४९ नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२७११४३४६८४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhise Govind Changoji

Digitally signed by Bhise Govind Changoji
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9596d652d5b6cb0f88e4c39c6c2adf97629debbf12176865f2683a6eb9318e8, cn=Bhise Govind Changoji
Date: 2019.02.27 12:55:02 +05'30'

डॉ.गोविंद भिसे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थसंकल्प व प्रशासन), पुणे-१.
३. उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे.
४. सहाय्यक संचालक, (लेखा व सेवा परिक्षा), आरोग्य सेवा, पुणे.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा),महाराष्ट्र-१/२, मुंबई.
६. जिल्हा कोषाधिकारी, ठाणे/ पुणे.
७. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सहसचिव (अर्थसंकल्प / राकावि), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुबई-१.
९. अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुबई-१.
१०.सचिव, नौरोसजी वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटल, परळ, मुंबई.
११.निवड नस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-१.

*****